**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com**

**बीड, कृषी हवामान सल्ला** **मंगळवार, दिनांक: १६ मार्च २०२१**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक १७ ते २१ मार्च २०२१ ) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १७/०३ | १८/०३ | १९/०३ | २०/०३ | २१/०३ |
| पाऊस | ०.० | ०.० | ०.० | ३.० | २०.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३८.० | ३९.० | ३९.० | ३८.० | ३६.० |
| किमान तापमान (अं.से.) | २२.० | २४.० | २१.० | २०.० | २०.० |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | २० | १९ | २८ | ४२ | ४९ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | १२ | १० | १३ | १७ | २३ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | १३ | १८ | १६ | २० | ९ |
| वा-याची दिशा | वायव्य | पश्चिम | दक्षिण-नैऋत्य | ईशान्य | आग्नेय |

| हवामानाचा इशारा | हवामान अंदाजानुसार जिल्हयात दिनांक 19 मार्च 2021 रोजी बीड जिल्हयात वादळी वारा, मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. दिनांक 20 मार्च 2021 रोजी बीड जिल्हयात वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व पावसासह तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| रब्बी पिके | काढणी अवस्था | वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व पावसासह तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असल्यामुळे, काढणीस तयार असलेल्या रब्बी ज्वारी, हरभरा, गहु आणि करडई या पिकांची लवकरात लवकर काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. ही पिके काढणी केली असल्यास ढीग तयार करून ती ताडपत्रीने झाकावीत. मळणी केलेला शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवण करावी. |
| हळद | काढणी अवस्था | सध्याच्या काळात हळदीची काढणी, हळद उकडणे, वाळवणे, पॉलिश करणे ही कामे सुरू आहेत. वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व पावसासह तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असल्यामुळे, हळदीची उघडयावर साठवण करू नये. |
| ऊस | वाढीची अवस्था | ऊस पिकात खोड किडीचा प्रादूर्भाव दिसून आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस 20 % २५ मिली किंवा क्लोरॅट्रानोलीप्रोल 18.5% ४मिली प्रति 10 लीटर पाण्यात मिसळून पावसाची उघाड बघून फवारणी करावी. |
| द्राक्ष | काढणी अवस्था | वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व पावसासह तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असल्यामुळे, काढणीस तयार असलेल्या द्राक्षांची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवण करावी. |
| केळी | वाढीची अवस्था | वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व पावसासह तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असल्यामुळे, केळीच्या बागेत केळीचे झाड कोलमडु नये म्हणुन झाडास आधार दयावा. |

| | | |
|---|---|---|
| भाजीपाला | काढणी अवस्था | वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व पावसासह तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असल्यामुळे, काढणीस तयार आसलेल्या भाजीपाला पिकांची तसेच टरबूज, खरबूज इत्यादी पिकांची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवण करावी.भाजीपाला पिकात (मिरची, वांगी, भेंडी) रसशोषन करणा-या किडींच्या व्यवस्थापनासाठी पायरीप्रॉक्झीफेन ५ % + फेनप्रोपॅथ्रीन १५ % १० मिली किंवा डायमिथोएट ३० % १३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघाड बघून फवारणी करावी. |
| फुलशेती | काढणी अवस्था | वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व पावसासह तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असल्यामुळे, काढणीस तयार असलेल्या फुलपिकांची काढणी व प्रतवारी करून, ती बाजारपेठेत विक्रीस पाठवावी. |
| पशुधन व्यवस्थापन | -- | वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व पावसासह तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असल्यामुळे, जनावरांना उघडयावर सोडू किंवा बांधू नये. निवा-याच्या ठिकाणी बांधावे व पावसात भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. जनावरांच्या गोठयाच्या छतावर ऊसाचे पाचट किंवा तुराटयाचे आच्छादन करावे. तसेच पाऊस चालू होण्याच्या वेळी झाडाच्या आडोशाला थांबु नये. |
| चारा पिके | साठवण | वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व पावसासह तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असल्यामुळे, काढणी केलेल्या ज्वारीचा कडबा पावसात भिजणार नाही याची दक्षता घ्यावी. कारण पावसात भिजल्यास त्याची प्रत खालावून साठवण क्षमता कमी होते व भिजलेला कडबा जनावरे खात नाहीत. |
| सामुदायिक विज्ञान | - | शरीरातील सर्व कामे व्यवस्थीत करण्याकरिता व आपल्या ऱ्हदयाचे ठोके व्यवस्थीत राहण्यासाठी मिठाचीगरज असते. मिठामुळे चव चांगली येते पण मिठाचा वापर कमी करावा. कारण जास्त मिठाचा वापर केल्याने रक्तदाब, ऱ्हदयरोग होतात. जास्त मिठामुळे हाडातील कॅल्शीयमचे शोषण होते. जागतिक आरोग्य संघटना यांनी प्रति दिवस ५ ग्रॅम पेक्षा कमी मिठाचा वापर करावा असे सुचविले आहे. |

**सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.**